महाराष्ट्र शासन – सार्वजनिक आरोग्य विभाग
राज्य आरोग्य माहिती व जीवनविषयक आकडेवारी कार्यालय,
डॉ. नायडू सांसर्गिक रुग्णालय आवार, केनेडी रोड, पुणे -४११ ००१

डॉ.मधुकर शि.पवार
उपसंचालक आरोग्य सेवा (आमाजिआ)
तथा उपमुख्य निबंधक
(जन्म व मृत्य) महाराष्ट्र राज्य

कार्यालय ☎ :- ०२० - २६०५९५३०
मा.सं. विभाग ☎ :- ०२० - २६०५८६१०
फॅक्स क्र. :- ०२० - २६०५८२९२
ई-मेल crs_d83@yahoo.com


परिपत्रक - ४ जा.क्र.आमाजिआ/कक्ष-८३/मार्गदर्शन/1609-1717/१५

दिनांकः-25/3/२०१५

प्रति,

१) जिल्हा आरोग्य अधिकारी तथा जिल्हा निबंधक जन्म-मृत्यु
जिल्हा परिषद ........... (सर्व)

२) आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु
महानगरपालिका ............ (सर्व)

३) कार्यकारी आरोग्य अधिकारी तथा निबंधक जन्म-मृत्यु,
बृहन्मुंबई महानगरपालिका, परेल, मुंबई.

४) कार्यकारी अधिकारी तथा निबंधक, जन्म-मृत्यु,
कॅन्टोनमेंट बोर्ड............ (सर्व)

विषय :- जन्म नोंदणी करताना बाळाच्या नावाबाबत घ्यावयाच्या काळजीबाबत केंद्र शासनाच्या जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९, कलम १४ च्या तरतूदीबाबत.

संदर्भ :- १) केंद्र शासनाचे उप महासंचालक यांचे पत्र क्र.१/१२/२०१४ व्हीएस(सीआरएस)/४१६२, दिनांक २९/१२/२०१२.

२) मा.संचालक आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक, जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्रं.संआसे/जन्म नोंदणी काळजी/कक्ष-१८/टि-६/३७०/१५, दि. ४/२/२०१५.

केंद्र शासनाचे उप महासंचालक श्री.आर.के.गौतम यांचे उपरोक्त संदर्भिय इंग्रजी पत्राची प्रत सोबत जोडली आहे. त्या पत्रानुसार बाळाची जन्म नोंदणी मध्ये बाळाचे नावाची नोंद करताना घ्यावयाच्या काळजीबाबत काही महत्वाच्या मार्गदर्शक सूचना खालील प्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १४ अन्वये जर जन्म नोंदवही मध्ये बाळाच्या जन्माची नोंद बाळाच्या नावाशिवाय केली असेल अशा प्रकरणामध्ये असे निदर्शनास आले आहे की, जन्म नोंदवही मध्ये बाळाच्या नावाची नोंदणी करताना सुरक्षिततेच्या दृष्टीने पुरेशी काळजी घेतली जात नाही असे दिसून येते. त्यामुळे नंतर नावात बदल, दुरुस्ती/माहिती इ. असे प्रश्न निर्माण होत असल्याची तक्रार निबंधकांकडून प्राप्त झाल्याचे दिसून येते.

२) आपणास विदितच आहे की, केंद्र शासनाच्या जन्म-मृत्यु अधिनियमा मधील तरतुदी नुसार जन्म नोंदी मध्ये नावात पूर्णतः बदल अथवा दुरुस्ती करता येत नाही. फक्त लेखनप्रमाद अथवा औपचारीक चूक असल्यास (काना, मात्रा, वेलांटी इ.) तसेच कपटाने अथवा अयोग्य रितीने एखादी नोंद झाल्यास नावात दुरुस्ती करता येते. जन्म नोंदी मध्ये बाळाचे नांव समाविष्ठ करण्यासाठी प्राप्त झालेल्या अर्जा सोबत बाळाचे नांव समाविष्ठ करण्यासाठी सुरक्षिततेच्या दृष्टीने घ्यावयाच्या काळजी बाबत खालील प्रमाणे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

जन्म नोंदणी करताना बाळाचे नाव निश्चित झाले नसल्यास बाळाचे टोपन नावाची (उदा. मुन्ना, मुन्नी, गुड्डी, पप्पू, पप्पी, बेबी...इ.) नोंदणी करण्यात येऊ नये. बाळाच्या नावाची नोंद बाळाचे नाव निश्चित झाल्याशिवाय करु नये.

बाळाच्या नांवाची जन्म नोंदणी करताना बाळाचे नाव ठेवणेबाबत बाळाच्या नावाची निश्चिता झाली नसल्यास अशा प्रकरणी जन्म प्रमाणपत्र वितरीत करताना बाळाचे नावाचे जागेच्या रकान्यात ............ (dash) लिहून जन्म प्रमाणपत्र वितरीत करावे.

## जन्म नोंदणी विहीत प्रक्रिया

- जन्म नोंदणी झाल्यापासून १२ महिन्यापर्यंत कसलाही विलंब शुल्क न आकारता जन्म नोंदणी अभिलेखात बाळाचे नाव समाविष्ठ करता येईल.
- जन्म नोंदणी मध्ये बाळाच्या नांवा व्यतिरिक्त नोंद केली असल्यास विहीत नियमान्वये बाळाचे नाव समाविष्ठ करण्यासाठी नोंदणी दिनांकापासून १५ वर्षापर्यंत विलंब शुल्क भरुन नोंदणी करता येईल.

- जन्म दाखल्यात बालकाच्या नावाची नोंद एकदा केल्यानंतर त्यामध्ये कोणताही बदल करता येत नाही. त्यामुळे संबंधितांना बाळाचे नांव निश्चित झाल्यानंतरच बाळाच्या नावाची नोंदणी करणेबाबत सूचीत करावे.
- जन्म नोंदवही मध्ये बाळाच्या नांवाची इंग्रजी मध्ये नोंद घेण्याची विनंती केली असल्यास त्याची नोंद 'कॅपिटल' अक्षरात करण्यात यावी. त्यामुळे स्पेलिंग मधील चुकाचे प्रमाण कमी होईल.
- जर जन्म नोंदणी मध्ये नावाची उशिरा नोंद करताना उदा. बालक शाळेत शिकत असताना शाळेचा दाखला प्राप्त करुन घ्यावा. बालकाच्या नावाची नोंदणी करताना शाळेचा दाखल्यातील बाळाच्या नांवाची पडताळणी करावी.
- बाळाच्या नावाची नोंदणी करताना बालकाच्या आई, वडीलांचे व बाळाच्या नावामध्ये कसलाही बदल होणार नाही. याबाबत सोबतच्या विहित नमुन्यामध्ये घोषणापत्र (Self declaration) घेण्यात यावे. जेणेकरुन लेखन प्रमाद होणार नाही. घोषणापत्राचा नमुना सर्व नागरिकांना दिसेल अशा रितीने कार्यालयाच्या इमारती बाहेर लावण्यात यावा.

आपल्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या निबंधकाना वरील केंद्र शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचना पाठविण्यात येऊन त्या प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

उपसंचालक आरोग्य सेवा
तथा उपमुख्य निबंधक जन्म-मृत्यु
महाराष्ट्र राज्य पुणे-१

प्रत सादर -
मा.अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, जी.टी.हॉस्पीटल आवार, १० वा मजला, नविन मंत्रालय, मुंबई-१.

प्रत माहितीस्तव सादर :-
मा. संचालक, आरोग्य सेवा तथा मुख्य निबंधक जन्म-मृत्यु, महाराष्ट्र राज्य, मुंबई-१.

प्रत सस्नेह :-
उपसंचालक, आरोग्य सेवा, परिमंडळे .......... (सर्व)

प्रत उचित कार्यवाहीस्तव :-
मा. सहाय्यक संचालक, नगरपालिका प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय,.......... (सर्व)

उपसंचालक
आरोग्य सेवा (आ.मा.जी.आ.)
पुणे
दिनांक 25 MAR 2015
जावक क्र. 1609-1717